• वर्ष : ०३ • अंक : २५५ • पुणे • शनिवार, दि. ०६ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**














# बनावट माल विक्रेत्यांवर धाड

## साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

• खेड पोलीसांची कारवाई

शहरात नामांकित पुमा कंपनीच्या बनावट माल विक्रेत्यांवर धाड टाकून ७ लाख ३८ हजार ८८६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून पाच जणांवर पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॉपीराईट कायद्याच्या भंग प्रकरणी पाच व्यावसायिकांविरुद्ध ही कारवाई करण्यात आली असून पुमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. याबाबत खेड पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, नामांकित पुमा कंपनीच्या अधिकृत नावाचा आणि लोबोचा वापर करून बनावट कपडे आणि पादत्राणांची विक्री शहरात सुरू असल्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी ही धडक कारवाई केली. या कारवाईत वाडा रस्ता येथील उमेश ट्रेडिंग कंपनी, साई आर्केड मधील पवार फुटवेअर, रॉयल होलसेल हब या दुकानांमधून बनावट टीशर्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट, बूट, चप्पल तसेच पुमा कंपनीचा लोगो असलेले रिकामे बॉक्स जप्त करण्यात आले. या तपासात उमेश ट्रेडिंग कंपनी होलसेल क्लॉथ सेंटर, पवार फुटवेअर हब, रॉयल होलसेल हब, सेंट्रल मेन्स हब आणि होलसेल हब मधून बनावट वस्तू तसेच बनावट माल जप्त करण्यात आला. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ७ लाख ३८ हजार ८८६ रुपये इतकी आहे. या प्रकरणी उमेश संभाजी सातपुते, सुनील रघुनाथ पवार, आजाद रशीद मोमीन, फैजल अब्दुल गफ्फार शेख, आणि युवान आसिफ मोमिन यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित दुकानदारांकडे पुमा कंपनीच्या उत्पादनांच्या विक्रीचा अधिकृत परवाना नसतानाही कंपनीच्या मूळ व्यापारचिन्हाशी मिळतेजुळते लोबो, रंगसंगती आणि चिन्हांचा वापर करून ग्राहकांची दिशाभूल केली जात असल्याचं पोलीसांनी सांगीतलं.

# एसएसआय मंत्रा रोबोटिक सिस्टिमचा विश्वविक्रम

## • २०,००० किलोमीटर अंतरावर बसून भारतीय शल्यचिकित्सकाने केली जगातील सर्वात लांब अंतरावरील हृदय टेली-सर्जरी •

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या प्रगत रोबोटिक तंत्रज्ञानाने आणि भारतीय डॉक्टरांच्या कौशल्याने पुन्हा एकदा संपूर्ण जगाला थक्क केले आहे. प्रख्यात हृदय शल्यचिकित्सक डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी गयानामध्ये बसून भारतातील इंदूर येथे असलेल्या रुग्णाच्या हृदयावर यशस्वी रोबोटिक टेली-सर्जरी करून वैद्यकीय इतिहासात नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. सुमारे २०,००० किलोमीटर अंतरावरून करण्यात आलेली ही शस्त्रक्रिया जगातील आतापर्यंतची सर्वात लांब अंतरावरील रोबोट-सहाय्यित हृदय टेली-सर्जरी मानली जात आहे. ही ऐतिहासिक प्रक्रिया गयानातील जॉर्जटाउन पब्लिक हॉस्पिटल कॉर्पोरेशन (GPHC) आणि भारतातील IRCAD इंडिया, इंदूर यांच्यामध्ये यशस्वीपणे पार पडली.या यशाची सर्वात महत्त्वाची



बाब म्हणजे ही शस्त्रक्रिया पूर्णपणे भारतात विकसित करण्यात आलेल्या एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम च्या सहाय्याने करण्यात आली.

डॉ. सुधीर श्रीवास्तव यांनी गयानामध्ये असलेल्या SSI MantrAsana Tele-Surgeon Console वरून शस्त्रक्रिया नियंत्रित केली, तर रुग्ण इंदूर येथील IRCAD इंडिया येथे उपस्थित होता. रोबोटिक आर्म्सनी डॉक्टरांच्या हातांच्या हालचालींची रिअल-टाइममध्ये अचूक पुनरावृत्ती करत हृदयावरील गुंतागुंतीची Left Internal Mammary Artery (LIMA) Takedown प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. सुमारे २९० ते ३०० मिलीसेकंद नेटवर्क लेटन्सी असूनही संपूर्ण शस्त्रक्रिया अत्यंत अचूकता आणि स्थिरतेने पार पडली. या प्रक्रियेदरम्यान भारतात मणिपाल हॉस्पिटल, जयपूर येथील मुख्य हृदय शल्यचिकित्सक डॉ. ललित मलिक हे टेबल-साइड सर्जन म्हणून उपस्थित होते.

डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले – जगातील कोणत्याही रुग्णापर्यंत पोहोचेल तज्ज्ञता,या ऐतिहासिक यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल इंक.चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, "२०,००० किलोमीटरच्या विक्रमी अंतरावरून यशस्वीरीत्या करण्यात आलेली ही हृदय टेली-सर्जरी हे सिद्ध करते की भविष्यात जगातील कोणत्याही कोपऱ्यात असलेल्या रुग्णापर्यंत सर्वोत्तम शस्त्रक्रिया तज्ज्ञता पोहोचवता येईल. आमचे ध्येय जागतिक दर्जाची शस्त्रक्रिया प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवणे आहे."

एसएसआय मंत्राची टेली-सर्जरी तंत्रज्ञान प्रणाली विशेषतः लांब अंतर आणि उच्च नेटवर्क लेटन्सी असलेल्या परिस्थितीतही अचूकता कायम ठेवण्यासाठी विकसित करण्यात आली आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे आतापर्यंत जगभरात १७३ हून अधिक टेली-सर्जरी यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल, इंक. (Nasdaq: SSII) ही एक अग्रगण्य सर्जिकल रोबोटिक्स कंपनी असून ती नाविन्यपूर्ण रोबोटिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञान विकसित करते. रोबोटिक शस्त्रक्रियेचे फायदे जगभरातील अधिकाधिक लोकांपर्यंत सुलभ, परवडणारे आणि प्रभावीपणे पोहोचवणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

कंपनीच्या प्रमुख उत्पादनांमध्ये तिची स्वदेशी SSi Mantra सर्जिकल रोबोटिक सिस्टिम आणि SSi Mudra या रोबोटिक सर्जिकल उपकरणांची व्यापक श्रेणी समाविष्ट आहे. हे अत्याधुनिक उपाय हृदय शस्त्रक्रियेसह विविध प्रकारच्या रोबोटिक शस्त्रक्रियांना सहाय्य करतात. SSi Mantra ही एक अत्याधुनिक, वापरकर्ता-अनुकूल, मॉड्युलर आणि मल्टी-आर्म रोबोटिक सर्जरी सिस्टिम आहे, जी आधुनिक शस्त्रक्रियेच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहे. या सिस्टिममध्ये 3 ते 5 मॉड्युलर रोबोटिक आर्म्स, एर्गोनॉमिक आणि ओपन-फेस्ड सर्जन कमांड सेंटर, मोठा 3D 4K मॉनिटर, रुग्णाशी संबंधित सर्व माहिती प्रदर्शित करण्यासाठी टच-पॅनल मॉनिटर, रोबोटिक आर्म कार्ट्सचे रिअल-टाइम व्हर्च्युअल इमेजिंग तसेच डायग्नोस्टिक इमेजिंगच्या 3D मॉडेल्सचे सुपरइम्पोझिशन यांसारखी अत्याधुनिक वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे

## ट्रॅक्टर पलटी होऊन शेतकऱ्याचा मृत्यू



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : शहराजवळील ढोरे-भांबुरवाडी (ता. खेड) येथे ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या अपघातात शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. हि घटना बुधवारी ( दि ३ ) घडली. शंकर विठ्ठल भांबुरे (वय ३८, रा. ढोरे - भांबुरवाडी ता खेड ) असे मृत्यू झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेबाबत खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर भांबुरे हे स्वतः शेतीच्या कामासाठी कामासाठी ट्रॅक्टर वेगात घेऊन जात असताना रस्त्यात ट्रॅक्टर पलटी झाला. या अपघातात भांबुरे हे गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. पुढील तपास खेड पोलिस करत आहे.

## तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन बंद करणे हाच कर्करोग टाळण्यासाठी उपाय

पुणे (आरंभ पर्व) : तंबाखूजन्य पदार्थ हे आरोग्यासाठी हानीकारक आहेत, हे सर्वज्ञात असून देखील त्याचे प्रमाण कमी होत नाही.स्वत:च्या आरोग्याची हानी करून घेण्यापेक्षा वेळीच अशा तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन बंद करणे हाच कर्करोग टाळण्याच्या दिशेने सर्वोत्तम उपाय ठरू शकतो,असे मत तज्ञांनी व्यक्त केले. दरवर्षी 31 मे रोजी वर्ल्ड नो टोबॅको डे किंवा जागतिक तंबाखू विरोधी दिनाच्या निमित्ताने जनजागृती केली जाते. नोबल हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर येथील वरिष्ठ कर्करोग तज्ञ डॉ.मिनिष जैन म्हणाले की,हेड ॲन्ड नेक कॅन्सर (डोके आणि मानेच्या भागात होणारा कर्करोग) असलेल्या रूग्णांचे प्रमाण कमी झालेले नाही.जगभरात सर्व कर्करोगांपैकी 30 ते 40 टक्के कर्करोग हे तंबाखूजन्य पदार्थांमुळे होतात. शहरी भागात जीवनशैलीशी निगडित कर्करोगाचे प्रमाण वाढत असताना ग्रामीण भागात तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणाऱ्या कर्करोगाचे प्रमाण इतरी कर्करोगांपेक्षा जास्त आहे.यामध्ये पुरूषांचे प्रमण अधिक दिसून येते. त्यातील सर्वांत मोठी समस्या म्हणजे हे रूग्ण कर्करोगाच्या पुढील टप्प्यात तपासण्यांसाठी येतात. फुफ्फुसाचा कर्करोग होण्याच्या प्रमाणामध्ये सुमारे 85 टक्के हे धुम्रपानाशी निगडित आहे.जगभरात कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी 25 टक्के हे फुफ्फुसाच्या कर्करोगामुळे होतात. त्यामुळे याबाबत जागरूकता निर्माण केल्यास आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन थांबवल्यास यामुळे होणारे मृत्यू आपण लक्षणीयरित्या कमी करू शकतो. डॉ.जैन पुढे म्हणाले की,कर्करोगाच्या उपचारांमध्ये गेल्या काही वर्षात लक्षणीय सुधारणा झाल्या असून इम्युनो थेरपी,टार्गेटेड थेरपी व चांगले औषधोपचार उपलब्ध आहेत.मात्र हा कर्करोग टाळण्याजोगा आहे आणि त्यामुळेच त्याच्या प्रतिबंधावर आपण लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

## मा. लोकेश चंद्र यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पुरस्कार

पुणे (आरंभ पर्व) : मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ‘महा आयकॉन 2026’ हा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला. राज्याचे उद्योगमंत्री श्री. उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक श्री. प्रतापसिंह जाधव आणि संपादक श्री. योगेश जाधव मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी ‘पुढारी’ माध्यम समूहाने ‘महा आयकॉन 2026’ या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

## हातभट्टी अड्ड्यांवर छापे; विषारी रसायनांचा साठा जप्त

पुणे (आरंभ पर्व) : वारजे माळवाडी आणि केशवनगर (मुंढवा) परिसरात सुरू असलेल्या हातभट्टी दारू अड्ड्यांवर पोलिसांनी छापे टाकून दारूसह विषारी रसायनांचा साठा जप्त केला. हडपसर आणि फुगेवाडीत विषारी दारूमुळे अनेकांचे मृत्यू झाल्यानंतरही हे अड्डे सुरूच होते. हे दोन्ही दारू अड्डे महिलाच चालवत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वारजे माळवाडीतील काळेश्वरी मंदिराच्या मागील मोकळ्या जागेत नवसागर आणि इतर विषारी रसायने मिश्रित करून गावठी हातभट्टी दारू सर्रास विकली जात होती. बुधवारी (ता. ३) रात्री या अड्ड्यावर वारजे माळवाडी पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी मुख्य आरोपी प्रीती विजय नवले (वय ३८, रा. वारजे माळवाडी) हिला अटक केली आहे. तिच्यासह सागर बिरे, शशी कचरावत, सुधीर कचरावत, संगीता परदेशी, जुबेर शेख, वैशाली उर्फ याडी चव्हाण, लताबाई रास्ते या सात साथीदारांविरुद्ध वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी महिलेने दोन-तीन दिवसांपूर्वीच तीनशे लिटर विषारी रसायनमिश्रित दारू विकत आणल्याचे तपासात समोर आले आहे.

# सौर कृषिपंपांमध्ये गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे. प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे. देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार, उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे. याआधी महाराष्ट्राने महावितरणच्या माध्यमातून मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत एकाच महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याची विश्वविक्रमी कामगिरी केली आहे.

# अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी गणेशोत्सव अधिक पर्यावरणपूरक, शिस्तबद्ध आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त पद्धतीने साजरा करण्याच्या उद्देशाने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१, पर्यावरण विभाग अंतर्गत "माय सिटी माय प्रॉमिस" शिस्त व पर्यावरणपूरक वर्तन बदलासाठी अभियान आणि जय गणेश व्यासपीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ – मार्गदर्शन शिबिर" आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजल्यापासून लोकमान्य सभागृह, टिळकवाडा, नारायण पेठ येथे होणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे समन्वयक विष्णू भेडा व पीयूष शाह यांनी दिली




गणेशोत्सवातील विविध पैलूंवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन या शिबिरात मिळणार आहे. इतिहासकार, लेखक व संशोधक मंदार लवाटे हे "गणेशोत्सव संस्कृती आणि सामाजिक महत्त्व" या विषयावर मार्गदर्शन करतील. पारंपरिक कला पुनरुज्जीवनासाठी कार्यरत असलेले डिझायनर चंद्रशेखर भेडा (नवी दिल्ली) हे "गणेशोत्सव देखावे व रथ : कला, हस्तकला आणि नावीन्यपूर्णता" या विषयावर विचार मांडतील.

संगणक तज्ज्ञ व लेखक डॉ. दीपक शिकारपूर हे "तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) चा वापर" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई हे ध्वनीप्रदूषण आणि लेझर लाईटमुळे होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देतील. तसेच रोटेरियन मनोज धारप हे निर्माल्य व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करतील.

याशिवाय "नेट झिरो संकल्पना आणि अनुकरणीय गणेशोत्सव पारितोषिक २०२६" याबाबतही सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. कार्यक्रमात नामवंत मंडळांचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, रोटरीचे सदस्य, पोलीस अधिकारी, कलाकार आणि पत्रकार सहभागी होऊन चर्चासत्रात सहभाग नोंदविणार आहेत.

रोटरी डिस्ट्रिक्ट 3131,पर्यावरण विभागाचे प्रमुख राजेंद्रकुमार सराफ, महेश सूर्यवंशी, श्रीकांत शेट्टे, अण्णा थोरात, रवींद्र अण्णा माळवदकर, संजीव जावळे, शिरीष मोहिते, उदय जगताप ,संजय बालगुडे , बाळासाहेब मारणे, विकास पवार असे प्रमुख मंडळाचे कार्यकर्ते यांच्या चर्चासत्राने शिबिराची सांगता होणार आहे. गणेशोत्सव अधिक पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि समाजाभिमुख करण्यासाठी कार्यरत असलेल्या गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या मार्गदर्शन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एमआयटी एडीटी विद्यापीठात ‘एक पेड़ माँ के नाम’ मोहिम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात ‘एक पेड़ माँ के नाम’ या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत ३०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ नेव्हल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (मॅनेट) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यापीठाचे प्र-कुलपती व कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड यांच्या प्रेरणेने तसेच कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मोहिमेत मॅनेटच्या ३०० कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कांचन, बहावा, गुलमोहर आणि पाम (ताड) यांसह



विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड विद्यापीठ परिसरात करण्यात आली. या प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. नचिकेत ठाकूर, विद्यार्थी कल्याण संचालक प्रा. डॉ. सूरज भोयर, मॅनेटचे प्राचार्य कॅप्टन प्रेरित मिश्रा, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण, एमआयटी स्कूल ऑफ ड्रामाचे प्राचार्य डॉ. अमोल देशमुख, सुरक्षा व दक्षता संचालक कर्नल प्रशांत वाघमारे, उपकुलसचिव डॉ. हनुमंत पवार, सहाय्यक संचालक डॉ. प्रतिभा जगताप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दशकपूर्ती वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात वृक्षारोपणाबरोबरच पर्यावरण जनजागृतीलाही प्राधान्य देण्यात आले. यानिमित्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या तीन पर्यावरणविषयक लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले. यामध्ये ‘पृथ्वी आपली, जबाबदारीही आपली!’, ‘बिन इट राइट!’ आणि ‘गिरिमित्र’ या लघुपटांचा समावेश होता.

निसर्ग संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत जीवनशैली यांविषयी प्रभावी संदेश या चित्रफितींमधून देण्यात आला. ‘पर्यावरण संवर्धन ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून ती जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे. हरित परिसर निर्मितीसाठी आणि भावी पिढ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे,’ असे मत डॉ.नचिकेत ठाकूर यांनी व्यक्त केले. भविष्यातही पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महिला पोलिस सोनाली हिंगे हिचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अल्पवयीन मुलीचा वापर करून एका महाविद्यालयातील प्राध्यापकाकडून सात लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणातील महिला पोलिस सोनाली हिंगे हिचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. वाय लाडेकर यांनी हा आदेश दिला. याबाबत एप्रिल २०२६ मध्ये बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अटकपूर्व जामिनासाठी हिंगे यांनी न्यायालयात अर्ज केला होता. सरकार पक्षातर्फे ॲड. सुनील हांडे यांनी जामिनास विरोध करत, हिंगे ही दामिनी पथकातील सदस्य असून अन्य दोन पोलिस कर्मचाऱ्यांसह खंडणी प्रकरणातील सहआरोपी असल्याचे सांगितले. प्राध्यापकाकडून उकळलेल्या सात लाख रुपयांपैकी एक लाख रुपये तिच्याकडे गेल्याचा आरोप असून, ती रक्कम आणि बनावट अर्ज तयार करण्यासाठी वापरलेला लॅपटॉप जप्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणात इलेक्ट्रॉनिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि बनावट अर्जाबाबत अधिक तपास आवश्यक असल्याने अर्जदाराची कोठडीत चौकशी गरजेची असल्याचा युक्तिवाद सरकार पक्षाने केला. सरकार पक्षासह बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने हिंगे हिचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

# कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणासाठी महापालिकेची धडक कारवाई

## ९ आरसीसी इमारतींसह अतिक्रमण हटविले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील सातारा रस्ता आणि सोलापूर रस्ता यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या कात्रज-कोंढवा मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी पुणे महानगरपालिकेने शुक्रवारी मोठी अतिक्रमण हटाव कारवाई केली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त (वि) ओमप्रकाश दिवटे यांच्या उपस्थितीत राजस सोसायटी परिसरात ही मोहीम राबविण्यात आली.

कात्रजकडून कोंढव्याकडे जाणाऱ्या मार्गावरील निखिल मार्बल ते एसबीआय चौक, सुंदरबन या परिसरात रस्ता रुंदीकरणासाठी बाधित मिळकतींमधील पक्की बांधकामे, अनधिकृत शेड, टपऱ्या व स्टॉल हटविण्यात आले. संबंधित मिळकतधारकांना यापूर्वी सुमारे दहा दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. मात्र मुदत संपल्यानंतर महापालिकेने प्रत्यक्ष कारवाई केली.

महापालिकेच्या माहितीनुसार, कात्रज-कोंढवा रस्ता विकास आराखड्यानुसार ८४ मीटर रुंदीचा प्रस्तावित असून पहिल्या टप्प्यात ५० मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्यात येत आहे. सुमारे ३.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पासाठी १०९ मिळकतधारकांच्या ४१ हजार चौरस मीटर जागेचा निवाडा जाहीर करण्यात आला असून ताबा प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पामध्ये मुख्य रस्त्यासह दोन्ही बाजूंना सेवा रस्ते, यू-ड्रेन पावसाळी वाहिनी तसेच माऊलीनगर येथे ग्रेड सेपरेटरचा समावेश आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या उड्डाणपुलासाठी आवश्यक सेवा रस्त्यांचे कामही पूर्णत्वाकडे आले आहे. कारवाईदरम्यान ११ हजार ५०० चौरस मीटर व्यावसायिक आणि १ हजार ४१० चौरस मीटर निवासी क्षेत्रातील अतिक्रमणे हटविण्यात आली. यामध्ये ९ दुमजली आरसीसी इमारती, १४ पत्र्याची शेड, १२ स्टॉल तसेच सीमाभिंतींचे निष्कासन करण्यात आले. या मोहिमेसाठी ६ जेसीबी, १४ डम्पर, २ क्रेन, २५ बिगारी आणि महाराष्ट्र सुरक्षा दलाच्या जवानांची मदत घेण्यात आली. पुढील काही दिवस कात्रज-कोंढवा मार्गावरील अतिक्रमणांविरोधात अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०६ जून २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासला धरण परिसरात वृक्षारोपण अभियान

पुणे (आरंभ पर्व) : जागतिक पर्यावरण दिन तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्ती निमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, पुणे शहरच्या वतीने खडकवासला धरण परिसरालगत वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. हे अभियान खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर पुणे भारतीय जनता युवा मोर्चा शहराध्यक्ष दुष्यंत मोहोळ तसेच प्रभाग ३३ चे नगरसेवक सुभाष नाणेकर आणि धनश्री कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिसर हरित करण्याच्या उद्देशाने विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष निखिल धावडे व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अजय बाबर, ऋत्विक मोरे, संतोष दरेकर, अभिजित कांबळे, दत्ता नाणेकर, सुनील पायगुडे, रोहित परदेशी, किरण भिंगारे, रविंद्र सिंग आणि अथर्व पवार यांनी वृक्षारोपण मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. युवकांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारण्याचे आवाहन केले. या उपक्रमामुळे खडकवासला परिसरातील हरित क्षेत्र वाढण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास हातभार लागणार आहे. यावेळी भारतीय जनता युवा मोर्चा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष निखिल लक्ष्मणराव धावडे यांनी पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

### पुणे महापालिकेच्या ‘पीएमसी ३६०’ प्रकल्पाला सिल्व्हर अवॉर्ड



पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेने डिजिटल प्रशासन आणि नागरिकाभिमुख सेवांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत राष्ट्रीय स्तरावरील मानाचा सन्मान पटकावला आहे. भारत सरकारच्या प्रशासकीय सुधारणा व सार्वजनिक तक्रार निवारण विभागामार्फत (DARPG) प्रदान करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार २०२६ मध्ये पुणे महापालिकेच्या ‘पीएमसी ३६०’ या डिजिटल परिवर्तन प्रकल्पाची ‘ई-गव्हर्नन्स अंतर्गत जिल्हा/शहरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरील उपक्रम’ या श्रेणीत सिल्व्हर अवॉर्डसाठी निवड करण्यात आली आहे. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, प्रजीत नायर, ओमप्रकाश दिवटे आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर राहुल जगताप यांच्या सहकार्याने गेल्या काही वर्षांत डिजिटल परिवर्तनाची व्यापक मोहीम राबविण्यात आली. यामध्ये महापालिकेच्या संकेतस्थळाचे आधुनिकीकरण, विविध डिजिटल प्रणालींचे पुनरुज्जीवन, नागरिकाभिमुख ऑनलाइन सेवांचा विस्तार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित सुविधांची निर्मिती करण्यात आली. या सर्व उपक्रमांचे सादरीकरण नवी दिल्ली येथे तज्ज्ञ समितीसमोर करण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील मूल्यमापन प्रक्रियेत ‘पीएमसी ३६०’ प्रकल्पाची सिल्व्हर अवॉर्डसाठी निवड झाली. विविध विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आला आहे.

### “आदिवासी भागात गांडूळ खताचा नवा प्रयोग; सेंद्रिय शेतीला चालना”



पुणे (आरंभ पर्व) : खेडेगावातील आदिवासी भागात सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी गांडूळ खत निर्मितीचा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. बांबूंच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या लाकडी पेट्यांमध्ये हा प्रकल्प उभारण्यात येत असून, काही पेट्या गोलाकार, काही चौकोनी तर काही आयताकृती स्वरूपाच्या आहेत. या पेट्यांमध्ये जनावरांचे शेण, झाडांचा पालापाचोळा, पिकांचे अवशेष तसेच भाजीपाल्याचा उरलेला भाग टाकून सेंद्रिय खत तयार केले जाते. या प्रक्रियेत गांडुळे महत्त्वाची भूमिका बजावतात. रोज या मिश्रणावर पाणी शिंपडून योग्य ओलावा राखला जातो आणि काही दिवसांतच उत्कृष्ट प्रतीचे जैविक खत तयार होते. या खताला बाजारात मोठी मागणी असून सेंद्रिय शेतीसाठी ते अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या खताच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता वाढते, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते आणि शेती उत्पादनात लक्षणीय वाढ होत असल्याचे शेतकरी सांगतात. हा उपक्रम सुयश चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या माध्यमातून राबवला जात असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह राजस्थान आणि ओडिशा राज्यांतही विस्तारला आहे. शेतकऱ्यांना कमी खर्चात सेंद्रिय खत निर्मितीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. अशा प्रकारच्या खत निर्मितीच्या पेट्या शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून त्या विकत घेण्यासाठी शासनाने आर्थिक योगदान द्यावे, अशी मागणी संस्थेकडून करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास, कार्याध्यक्ष स्मिता घैसास आणि शलाका घैसास यांनी ही माहिती दिली.

# इंद्रियाची झेप; हडपसर आणि वाकडमध्ये दोन नवीन स्टोअर्स सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आदित्य बिर्ला ज्वेलरीच्या ‘इंद्रिया’ या ब्रँडने पुण्यातील आपली उपस्थिती अधिक मजबूत करत हडपसरमधील अमानोरा मॉल आणि वाकडमधील फिनिक्स मॉल ऑफ द मिलेनियम येथे दोन नवीन स्टोअर्स सुरू केली आहेत. या नव्या स्टोअर्समुळे पुण्यातील इंद्रियाच्या एकूण स्टोअर्सची संख्या आता सहावर पोहोचली आहे.

महाराष्ट्रातील विस्तार धोरणात पुणे ही इंद्रियासाठी महत्त्वाची बाजारपेठ मानली जाते. वाढत्या प्रमाणात वैयक्तिकृत आणि अनुभवाधारित खरेदीला पसंती देणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन ही नवीन स्टोअर्स विकसित करण्यात आली आहेत. शहरातील प्रमुख रिटेल आणि लाइफस्टाइल केंद्रांमध्ये सुरू झालेल्या या स्टोअर्समधून ग्राहकांना आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण खरेदीचा अनुभव मिळणार आहे.

इंद्रियाच्या या नव्या स्टोअर्समध्ये ३२ हजारांहून अधिक दागिन्यांच्या डिझाइन्सचा समावेश असून त्यामध्ये ब्राइडल, सणासुदीचे, समकालीन तसेच रोजच्या वापरासाठीचे हलक्या वजनाचे दागिने उपलब्ध आहेत. ग्राहकांना अधिक खास अनुभव देण्यासाठी स्टोअर्समध्ये विशेष कारीगरी रूम्स आणि ब्राइडल लाउंजची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या विस्तारामुळे पश्चिम भारतातील बाजारपेठेत इंद्रियाची उपस्थिती आणखी मजबूत होणार असून, ग्राहकांना ब्रँडचा विस्तृत दागिन्यांचा पोर्टफोलिओ आणि वैशिष्ट्यपूर्ण इन-स्टोअर अनुभव अधिक सहजपणे उपलब्ध होणार आहे. इंद्रियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहली म्हणाले, “पुणे ही इंद्रियासाठी महत्त्वाची विकासात्मक बाजारपेठ आहे. येथील ग्राहक डिझाइन-जागरूक असून अनुभवाधारित खरेदीला प्राधान्य देतात. हडपसर आणि वाकडमधील विस्तार हा उदयोन्मुख बाजारपेठांशी अधिक जवळीक साधण्याच्या आमच्या धोरणाचा भाग आहे. महाराष्ट्रातील दीर्घकालीन विस्तारासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”

## शॉपर्स स्टॉपमध्ये बीटीएसच्या ‘अरिरांग’ अल्बमची एंट्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील प्रीमियम फॅशन, सौंदर्य आणि गिफ्टिंग रिटेल ब्रँड शॉपर्स स्टॉपने जागतिक कीर्तीच्या बीटीएस (BTS) या पॉप बँडचा बहुप्रतिक्षित पाचवा स्टुडिओ अल्बम ‘अरिरांग’ देशभरातील निवडक स्टोअर्समध्ये उपलब्ध करून दिला आहे. या अल्बमच्या निमित्ताने बीटीएसच्या भारतीय चाहत्यांसाठी विशेष अनुभवात्मक उपक्रमही राबविण्यात आला आहे.

चाहत्यांचा उत्साह वाढवण्यासाठी शॉपर्स स्टॉपने आपल्या स्टोअर्समध्ये विशेष अनुभव कक्ष (Experience Zones) उभारले आहेत. या कक्षांमध्ये आकर्षक सजावट, फोटो काढण्यासाठी खास जागा आणि बीटीएस-प्रेरित वातावरणाची निर्मिती करण्यात आली असून चाहत्यांना अल्बमचा अनोखा अनुभव घेता येणार आहे. याबाबत शॉपर्स स्टॉपचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कवींद्र मिश्रा यांनी सांगितले की, ग्राहकांना नेहमीच



केंद्रस्थानी ठेवून कंपनी काम करत असून बीटीएसचा ‘अरिरांग’ अल्बम स्टोअर्समध्ये उपलब्ध करून देणे हा त्याच प्रयत्नांचा भाग आहे. जागतिक संगीत आणि फॅन कल्चरच्या वाढत्या प्रभावामुळे तरुण ग्राहकांशी अधिक प्रभावीपणे जोडले जाण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संग्रहणीय स्वरूपातील या अल्बममध्ये सीडी, फोटो कार्ड सेट, फोटो बुक आणि इतर विशेष वस्तूंचा समावेश आहे. कोरियन लोकगीत ‘अरिरांग’पासून प्रेरित असलेल्या या अल्बममध्ये बीटीएसच्या सांस्कृतिक मुळांचा, भावनांचा आणि चिकाटीचा प्रभाव दिसून येतो.

## जागतिक पर्यावरण दिनी ह्युंडाईच्या आयओएनआयक्यू फॉरेस्टमध्ये हरित भविष्याचा संकल्प

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ह्युंडाई मोटर इंडिया फाऊंडेशन (एचएमआयएफ) ने पुण्यातील डांगे चौक येथील आयओएनआयक्यू फॉरेस्टमध्ये विशेष समुदाय सहभाग उपक्रमाचे आयोजन केले. निसर्ग संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात १२० हून अधिक विद्यार्थी, महिला बचत गटांचे सदस्य आणि स्थानिक नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. एचएमआयएफने विकसित केलेले आयओएनआयक्यू फॉरेस्ट हे १०.५ एकर क्षेत्रावर विस्तारलेले शहरी जंगल असून, येथे मियावाकी पद्धतीने १० लाखांहून अधिक विविध प्रजातींची झाडे लावण्यात आली आहेत. हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण मानला जातो.

या उपक्रमात सहभागींसाठी नेचर ट्रेल, मार्गदर्शित सफारी,



जैवविविधता आणि वृक्षारोपण पद्धतींवरील माहितीपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. तसेच शहरी भागातील वाढत्या तापमानावर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरी जंगलांची भूमिका काय असते, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मितीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. याशिवाय ‘सीड बॉल’ उपक्रमांतर्गत सहभागी नागरिकांनी स्थानिक वृक्षांच्या बियांचा वापर करून बीजगोळे तयार केले आणि वृक्षारोपणासाठी योगदान दिले.

या कार्यक्रमात फर्ग्युसन महाविद्यालय, हरीभाई व्ही. देसाई महाविद्यालय, लक्ष्मीबाई बारणे हायस्कूल, प्रेरणा हायस्कूल, खिवंसरा पाटील हायस्कूल येथील विद्यार्थी तसेच स्थानिक महिला स्वयंसहाय्यता गटांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ह्युंडाई मोटर इंडिया फाऊंडेशनने आयओएनआयक्यू फॉरेस्ट उपक्रमाद्वारे शाश्वतता, हवामान स्थिरता आणि समुदाय सहभागाप्रती आपली बांधिलकी अधिक दृढ केली आहे. हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून, अधिक हरित, थंड आणि पर्यावरणपूरक भविष्य घडविण्याचा प्रयत्न असल्याचे संस्थेने स्पष्ट केले.

## ‘द ओडिसी’साठी ८ जूनपासून आयमॅक्स बुकिंग सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांच्या बहुप्रतिक्षित ‘द ओडिसी’ या चित्रपटाची प्रतीक्षा करणाऱ्या भारतीय प्रेक्षकांसाठी आनंदाची बातमी आहे. या चित्रपटासाठी आयमॅक्स ॲडव्हान्स बुकिंग भारतात ८ जूनपासून सुरू होणार असून, भारतीय प्रेक्षकांना जगातील पहिल्या काही प्रेक्षकांमध्ये स्थान मिळणार आहे, जे या चित्रपटासाठी आगाऊ तिकिटे बुक करू शकतील. ‘द ओडिसी’ हा संपूर्णपणे आयमॅक्स कॅमेऱ्यांनी चित्रित करण्यात आलेला जगातील पहिला चित्रपट ठरणार आहे. हा चित्रपट भारतासह




जगभरात १७ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. ऑस्कर विजेते दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. होमर यांच्या प्रसिद्ध महाकाव्यावर आधारित असलेल्या या चित्रपटात इथाकाचा राजा ओडिसियस याच्या ट्रोजन युद्धानंतरच्या दीर्घ आणि धोकादायक प्रवासाची कथा मोठ्या पडद्यावर नव्या स्वरूपात मांडण्यात आली आहे.

चित्रपटात मॅट डॅमन ओडिसियसच्या भूमिकेत दिसणार असून, टॉम हॉलंड त्याचा मुलगा टेलीमाकस, तर ॲन हॅथवे पेनेलोपीची भूमिका साकारणार आहेत. याशिवाय झेंडाया, रॉबर्ट पॅटिन्सन, ल्युपिटा न्योंगो, शार्लिझ थेरॉन आणि जॉन बर्न्थॉल यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी इंडियाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डेन्झिल डायस यांनी सांगितले की, ‘द ओडिसी’ हा चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील संपूर्णपणे आयमॅक्स कॅमेऱ्यांनी चित्रित झालेला पहिला चित्रपट आहे. हा टप्पा गाठण्यासाठी क्रिस्टोफर नोलन यांनी जवळपास दोन दशके प्रयत्न केले आहेत. ८ जून हा भारतीय प्रेक्षकांसाठी आणि नोलन यांच्या चाहत्यांसाठी विशेष दिवस ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

‘द ओडिसी’ची आयमॅक्स तिकिटे ८ जून २०२६ पासून विक्रीसाठी उपलब्ध होणार असून, १७ जुलै २०२६ रोजी हा चित्रपट देशभरातील चित्रपटगृहांमध्ये सर्व फॉरमॅटमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे.

## जाहीर नोटीस

मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात

आरटीएस/अपील नं. २२७/२०२५

अॅपेलंट

मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज.मु.

सचिन रामनाथ कासार

विरुध्द

**रेस्पॉडंट**

भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर

प्रति,

१) प्रमोद उध्दव रासने
२) हेमा अनिल रासने
३) ऐश्वर्या अनिल रासने
४) श्रावणी अनिल रासने
नं.१ ते ४ रा.श्रीराम कॉलनी, आरती हॉटेल मागे, नगर-पुणे रोड, केडगांव, अहिल्यानगर
५) प्रविण मोतीलाल डोरले रा. बोरीवली, मुंबई
६) सुरेखा सुहास रामचंद्रे रा. सराफ कटटा, मु.पो.सांगली, जि. सांगली.
७) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण
८) निर्मला रमेश पानपट
९) रंजना प्रकाश रासने
नं.७ ते ९ रा. दगडे गल्ली, मु.पो. शिरुर कासार, ता. शिरुर कासार, जि.बीड १०) भारती रमेश थिटे रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे.
११) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
१२) सिंधुबाई भोपाळराव बागवडे रा. फलॅट नं.९, फेज नं.३, वर्धमान कॉलनी, कोल्हापुर रोड, सांगली, जि. सांगली

ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस /विलंब माफी अर्ज नं. ११०/२०२४ दि.११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरुध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुंम्हा उत्तरार्थी पक्षकार म्हणुन सामील असुन तुम्हांस तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवुन देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही.

त्याअर्थी तुम्हास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दिनांक २९/०६/२०२६ रोजी दु.३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असुन सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसुर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आज दिनांक ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सहि व कार्यालयीन शिक्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी
अहिल्यानगर

# ‘हरित पुणे, समृद्ध पुणे’ मोहिमेला प्रारंभ; अल्प दरात रोपवाटप सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहराचे पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी आणि वाढत्या तापमानावर नियंत्रण मिळविण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत ‘हरित पुणे, समृद्ध पुणे’ मोहिमेअंतर्गत विविध उपक्रमांना सुरुवात करण्यात आली आहे. जागतिक पर्यावरण दिन आणि वनमहोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीराजे उद्यान येथे अल्प दरातील रोपविक्री, वृक्षारोपण आणि बीज संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. शुक्रवारी सकाळी झालेल्या या




कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे मुख्य समन्वयक विश्वस्त मकरंद टिल्लू, ॲड. राजेंद्र आगरवाल यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान इच्छुक वृक्षप्रेमी, नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांना स्थानिक जातींच्या रोपांचे वाटप करण्यात आले. तसेच दिवटे यांच्या हस्ते छत्रपती संभाजीराजे उद्यान परिसरात ‘बेल’ प्रजातीच्या वृक्षाचे रोपण करण्यात आले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पुणे शहरातील सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत तसेच विविध उद्यानांमध्ये वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आली. नदी पुनर्जीवन प्रकल्पांतर्गतही वृक्षारोपण करण्यात आले. वनमहोत्सव उपक्रमांतर्गत ५ जून ते १४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पुणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणामार्फत एक ते दीड वर्षे वयाच्या स्थानिक जातींच्या रोपांचे केवळ ५ रुपये प्रति रोप या सवलतीच्या दरात वितरण केले जाणार आहे. याशिवाय नागरिकांनी आपल्या परिसरातील वृक्ष व फळझाडांच्या बिया, बीज व बीजगोळे बीज संकलन केंद्रात जमा करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. या कालावधीत घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत तयार करण्यात आलेले सेंद्रिय खतदेखील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## फुलेप्रेमी कवीच्या कुटुंबाला तीन लाखांची आर्थिक मदत

पुणे (आरंभ पर्व) : बुलढाणा जिल्ह्यातील केळवद येथील अल्पभूधारक शेतकरी, तसेच फुलेप्रेमी कवी शाहीर मनोहर पवार यांचा शेतातील आंब्याच्या झाडावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. ते देशातील पहिली मुलींची शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियान व आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलच्या फुलेप्रेमी परिवारातील सक्रिय सदस्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या आकस्मिक निधनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या काळात फुलेप्रेमी कवी-कवयित्रींनी मदतीचा हात पुढे केला. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या समतावादी विचारधारेवर श्रद्धा ठेवून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत कार्य करणाऱ्या कवी-कवयित्रींना ‘फुलेप्रेमी कवी’ म्हणून ओळखले जाते. मनोहर पवार हे अशाच विचारांचे कार्यकर्ते व कवी होते. भिडेवाडाकार फुलेप्रेमी संविधान दूत कवी विजय वडवेराव यांनी मनोहर पवार यांच्या कुटुंबासाठी आर्थिक मदतीचे आवाहन केल्यानंतर देशभरातील फुलेप्रेमी कवी-कवयित्रींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अवघ्या तीन दिवसांत तीन लाख रुपयांचा निधी जमा करण्यात आला. पवार यांच्या दहाव्याच्या विधीच्या दिवशी केळवद येथे आयोजित कार्यक्रमात विजय वडवेराव यांनी समाजबांधवांच्या उपस्थितीत तीन लाख रुपयांचा धनादेश पवार यांच्या पत्नी आणि दोन्ही मुलींकडे सुपूर्द केला. या मदतीमुळे कुटुंबाला मोठा आर्थिक आधार मिळाला असून मुलींच्या शिक्षणासाठीही मदत होणार आहे. सहकारी कवीच्या निधनानंतर साहित्यिक आणि सामाजिक बांधिलकी जपत देशभरातील कवींनी एकत्र येऊन त्यांच्या कुटुंबासाठी तीन लाख रुपयांचा निधी उभारल्याची ही उल्लेखनीय घटना ठरली आहे. यावेळी विजय वडवेराव, अरविंद बनसोडे, संजय हिवाळे, डॉ. मंजू गौतम राजे-जाधव, मारोती कदम यांच्यासह फुलेप्रेमी कवी, ग्रामस्थ, कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होता. देशातील पहिली मुलींची शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियान व आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलच्या माध्यमातून विजय वडवेराव देशभरात महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन आणि संविधान मूल्यांच्या जनजागृतीचे कार्य करीत आहेत.



## सुबोध भावे अभिनीत ‘श्री बाबा नीब करोरी महाराज’ ला उदंड प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : २९ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या ‘श्री बाबा नीब करोरी महाराज’ या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अत्यंत उबदार प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटातील आध्यात्मिक खोली, भावस्पर्शी कथाकथन आणि प्रामाणिक अभिनयाचे विशेष कौतुक करत आहेत. आदरणीय नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा वारसा अत्यंत भक्तीभावाने व अस्सलतेने मोठ्या पडद्यावर मांडल्याबद्दल सोशल मीडियावर प्रेक्षक या चित्रपटाची भरभरून प्रशंसा करत आहेत. नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुबोध भावे यांच्यावर विशेष कौतुकाचा वर्षाव होत आहे; त्यांच्या शांत, तल्लीन आणि मनाचा ठाव घेणाऱ्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि चरित्रपटांमधील भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या भावे यांनी या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वात केलेले रूपांतर प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडले आहे. ही भूमिका स्वीकारण्याबाबत यापूर्वी बोलताना सुबोध भावे यांनी सांगितले होते, "जेव्हा शरदजींना हा चित्रपट बनवायचा होता, तेव्हा ते गेल्या ४-५ वर्षांपासून त्यावर काम करत होते. त्यांनी यापूर्वीही कलाकार आणि तंत्रज्ञांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता, पण तो यशस्वी झाला नाही. जानेवारी २०२५ मध्ये, एका लेखक मित्राद्वारे मला समजले की त्यांना मला भेटायचे आहे. जेव्हा आमची भेट झाली, तेव्हा त्यांनी मला बाबांवर चित्रपट बनवण्याबाबतची त्यांची संकल्पना (व्हिजन) सांगितली आणि ही भूमिका मीच साकारवी अशी इच्छा व्यक्त केली. त्यावेळी मला त्यांच्याबद्दल फारशी माहिती नव्हती—मी केवळ त्यांचा एक छायाचित्र पाहिले होते आणि त्यांच्याबद्दल वरकरणी ऐकले होते. शरदजींच्या माध्यमातूनच मला बाबांचा आणि त्यांच्या जीवनाचा खऱ्या अर्थाने परिचय झाला."

## ३.२६ लाख एकर क्षेत्र झाले पराली जाळण्यापासून मुक्त

मुंबई (आरंभ पर्व) : जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँकेने त्यांच्या परिवर्तन उपक्रमाचा एक भाग म्हणून सीआयआय फाऊन्डेशनच्या सहकार्याने क्रॉप रेसिड्यू मॅनेजमेंट (सीआएम) उपक्रमा अंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून या अंतर्गत २०२५ च्या मौसमात पंजाब आणि हरियाणातील ८८ टक्के म्हणजेच ३,७८,४२५ एकर क्षेत्राला पराली जाळण्यापासून वाचवण्यात यश मिळाले आहे. लुधियाना आणि संगरुर जिल्ह्यात असलेल्या ३८० गावांमधील ८६,००० शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि निष्कर्श दिसून येणाऱ्या प्रयत्नांच्या माध्यमातून उत्तर भारतातील कृषी क्षेत्रामुळे होणाऱ्या हवेच्या प्रदुषणावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. भात कापणीनंतर उरलेल्या परालीचे जाळणे हे दर हिवाळ्यात उत्तर भारतावर पसरून राहणाऱ्या गंभीर वायूप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांपैकी एक आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत होते आणि दीर्घकालीन हृदय व फुफ्फुसांच्या आजारांमध्ये वाढ होते.

# फुल दिले की फुलच मिळते, दगड दिले की दगडच मिळते

## त्यामुळे कुणी टीका केली तर शांत राहायचं. कुणाचे पाय कापून तर आपण उंच होणार नाही - जॅकी श्रॉफ

- जॅकी दादाच्या उपस्थितीने विट्याची ट्री आर्मी जागतिक नकाशावर- आमदार सुहास बाबर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खानापूर आटपाडीचे आमदार सुहास बाबर म्हणजे पिंपळाच्या झाडासारखा सळसळता उत्साह आहे. त्याला वाढविण्याची, जपण्याची आणि पाणी घालण्याची जबाबदारी तुमची-आमची आहे,” अशा हृदयस्पर्शी शब्दांत ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी शिवसेनेचे आमदार सुहास बाबर यांच्या कार्याचे कौतुक करत ट्री आर्मीच्या वृक्षलागवड चळवळीला भक्कम पाठिंबा दिला. गार्डी-घानवडच्या माळावर ट्री आर्मी आणि जेके फाउंडेशनच्या माध्यमातून साडेचार हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते या लोकचळवळीचा औपचारिक शुभारंभ झाला.

कार्यक्रमात बोलताना जॅकी श्रॉफ यांनी आमदार बाबर यांच्या साधेपणा, कार्यतत्परता आणि पर्यावरणावरील प्रेमाचे विशेष कौतुक केले. “फक्त बोलणारे आणि प्रत्यक्ष काम करणारे यांच्यात फरक असतो. सुहास बाबर हे बोलण्याइतकेच कृतीतही प्रामाणिक आहेत,” असे सांगत त्यांनी वृक्षलागवडीच्या माध्यमातून समाजाला दिशा देणाऱ्या या उपक्रमाचे अभिनंदन केले. पृथ्वी ही आपली आई असून तिचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने झाडे लावली पाहिजेत, असा संदेशही त्यांनी दिला.

आमदार सुहास बाबर यांनी ट्री आर्मी ही कोणत्याही पक्षाची नव्हे तर समाजाची चळवळ असल्याचे सांगितले. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या मताधिक्याइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला असून पुढील दोन वर्षांत ७८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जॅकी श्रॉफ यांच्या सहभागामुळे या मोहिमेला राष्ट्रीय ओळख मिळणार असून विट्यातून सुरू झालेली ट्री आर्मी आता देशभर आणि जगभर पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला मुंबईहून जॅकी श्रॉफ यांचे मित्र, ड्रीम वर्थ सोल्युशन या कंपनीचे संचालक उपस्थित होते. तसेच खानापूर पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा भोसले, नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, प्रांताधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार योगेश्वर टोम्पे, उपविभागीय पोलीस अधिकारी विपुल पाटील, गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे, उपसभापती सुहास शिंदे यांची ,माजी नगरसेवक अमर शितोळे, नविन यात्रा कमिटीचे अध्यक्ष रणजित पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन हेमंत बाबर, प्रकाश बागल, नगरसेवक रामचंद्र भिंगारदेवे, भालचंद्र कांबळे, रोहित पाटील, अँड. रोहित पवार, श्रीधर जाधव, सरपंच संग्राम नलवडे, सौरभ रोकडे, विशाल पाटील, दिलीप किर्दत, सुजय गोसावी यांच्यासह ट्री आर्मीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक फिरोज शेख यांनी केले. सूत्रसंचालन धीरज भिंगारदेवे यांनी केले. आभार राहुल साळुंखे यांनी मानले.

### आमदार आले जमिनीवर

आमदार बाबर म्हणाले, मला मी खुप जमिनीवर राहुन काम करतो असे वाटायचे परंतु जॅकी दादांच्याकडे पाहिल्यावर माझा हा भ्रम फुटला आहे. एक सेलिब्रिटी असुन देखिल किती विनम्र आणि किती साधे असावे हे पाहून आवाक झालो आहे. पत्नी सोनिया बाबर यांनी जॅकी श्रॉफ यांचे औक्षण करून पुष्पवृष्टी करून स्वागत केले. त्यानंतर बाजरीची भाकरी, तूप, गूळ आणि मीठ असा साधा नाष्टा त्यांनी केला. एवढा साधा माणूस मी माझ्या आयुष्यात पाहिला नसल्याचे गौरवोद्गार आमदार बाबर यांनी काढले.

## फिनोलेक्स केबल्समध्ये नेतृत्वबदल; महेश विश्वनाथन यांची CEO पदावर पदोन्नती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



भारतातील आघाडीच्या विद्युत आणि कम्युनिकेशन केबल उत्पादक कंपन्यांपैकी एक असलेल्या फिनोलेक्स केबल्स लिमिटेडने आज श्री. महेश विश्वनाथन यांची मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून पदोन्नती आणि श्री. सचिन नाईक यांची मुख्य वित्तीय अधिकारी (CFO) म्हणून नियुक्ती जाहीर केली. या नियुक्त्या १ जून २०२६ पासून प्रभावी आहेत. चार दशकांहून अधिक व्यावसायिक अनुभव असलेले आणि चार्टर्ड अकाउंटंट असलेले श्री. महेश विश्वनाथन हे गेली १७ वर्षांहून अधिक काळ फिनोलेक्स केबल्सशी संलग्न आहेत. त्यांनी यापूर्वी कंपनीचे मुख्य वित्तीय अधिकारी (CFO) म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कंपनीची आर्थिक व कार्यकारी पायाभूत रचना अधिक मजबूत करण्यास, व्यवसाय विस्ताराला चालना देण्यास आणि दीर्घकालीन विकास धोरणाची अंमलबजावणी करण्यास महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. श्री. सचिन नाईक जवळपास तीन दशकांचा अनुभव घेऊन फिनोलेक्स केबल्समध्ये CFO म्हणून रुजू होत आहेत. वित्तीय धोरण, भांडवल नियोजन, निधी उभारणी, गुंतवणूकदार संबंध, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, जोखीम व्यवस्थापन, व्यवसाय परिवर्तन आणि कार्यक्षमतेत सुधारणा या क्षेत्रांमध्ये त्यांना व्यापक अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी UPL, Supreme Industries आणि Shalimar Paints यांसारख्या अग्रगण्य कंपन्यांमध्ये वरिष्ठ नेतृत्वाच्या भूमिका सांभाळल्या असून, धोरणात्मक वाढ आणि परिवर्तनात्मक उपक्रमांचे नेतृत्व केले आहे.

## ५०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण; एक कोटी झाडांचा संकल्प

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बकोरी देवराई वनराई प्रकल्पात ५०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. ट्री टॉक फाऊंडेशनच्या माध्यमातून गेल्या नऊ वर्षांपासून या प्रकल्पात सातत्याने वृक्षारोपण आणि संवर्धनाचे कार्य सुरू असून आतापर्यंत एक लाखांहून अधिक झाडांची लागवड करण्यात आली आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी समर्पित असलेल्या या प्रकल्पात दरवर्षी विविध संस्था, वृक्षप्रेमी, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी होत असतात. यंदाही मोठ्या उत्साहात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.

यावेळी प्रकल्प प्रमुख वृक्षमित्र चंद्रकांत वारघडे यांनी पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण हा एकमेव शाश्वत मार्ग असल्याचे सांगितले. आतापर्यंत एक लाखांहून अधिक झाडे लावण्यात आली असून भविष्यात एक कोटी झाडांचे वृक्षारोपण करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी नमूद केले.



कार्यक्रमाला बकोरी ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी मनीषा इंगळे, माजी सरपंच सत्यवान गायकवाड, वृक्षमित्र धर्मराज बोत्रे, हवेली पंचायत समितीचे कृषी अधिकारी मुल्ला, कमलेश बहिरट, धनराज वारघडे, दत्तात्रय वारघडे, येरवडा वाहतूक विभागाचे पोलीस अधिकारी, आझाद हिंद तरुण मंडळ वडगावशेरीचे पदाधिकारी तसेच युथ टॅलेंट डेव्हलपमेंट सोसायटीचे चेअरमन बिंगानिया यांच्यासह पंचक्रोशीतील अनेक वृक्षमित्र आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी चंद्रकांत वारघडे यांनी पर्यावरण संरक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयावरील कार्यक्रमाला वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि राजकीय पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती खेदजनक असल्याचे सांगितले. पर्यावरण संवर्धन ही केवळ सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनीही सक्रिय सहभाग घेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बकोरी देवराई वनराई प्रकल्प हा केवळ वृक्षारोपणाचा उपक्रम नसून जैवविविधतेचे जतन करणारे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. या वनराईत हजारो पक्ष्यांना सुरक्षित अधिवास उपलब्ध झाला असून विविध वन्यजीव आणि जीवसृष्टीचे संवर्धन केले जात आहे. भूजलपातळी वाढविणे, तापमान नियंत्रण, मृदा संवर्धन आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यात या प्रकल्पाचे मोठे योगदान असल्याचे उपस्थितांनी सांगितले. कार्यक्रमात वाढते प्रदूषण, पर्यावरणीय संकटे आणि वृक्षसंवर्धनाची गरज यावर चर्चा करण्यात आली. शासनाच्या वृक्षारोपण मोहिमांबरोबरच झाडांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. ‘झाडे लावा, झाडे जगवा’ हा संदेश देत उपस्थितांनी दरवर्षी किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची शपथ घेत पर्यावरण संरक्षणाचा निर्धार व्यक्त केला.

## मुंबईत "शिवोत्सव" आणि ३५३ वा राज्याभिषेक सोहळा

श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी अध्याय आहेत, आपल्या महान कार्याने आणि लोककल्याणकारी धोरणांनी त्यांना जगाच्या इतिहासात अढळ स्थान मिळाले आहे. त्यांचा इतिहास भारतातील इतर राज्यातील भाषांतून पोहोचावा याहेतूने श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल या संस्थेच्या वतीने रविवार, दिनांक ७ जून २०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता दादर पश्चिम येथील धुरु हॉलमध्ये ३५३ वा राज्याभिषेक सोहळा "शिवोत्सव" आयोजित करण्यात आला आहे, या विनामूल्य कार्यक्रमास शिवप्रेमीनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे संस्थापक डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कृषी अर्थ तज्ज्ञ, केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि मुक्तपीठचे संपादक श्री. तुळशीदास भोईटे, शिवराजाभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड समितीचे अध्यक्ष श्री. सुनील पवार, मुंबई बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. संदीप सुर्वे, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष श्री. रवींद्र मालुसरे हे असणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार वेगवेगळ्या माध्यमात सातत्याने कार्यरत राहून जनमानसात पोहोचविणारे सर्वश्री सुप्रसिद्ध मल्लखांब प्रशिक्षक पद्मश्री श्री.उदय देशपांडे (राजमाता जिजाऊ सन्मान पुरस्कार), सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक, दुर्गसंवर्धक श्री. श्रमिक गोजमगुंडे( हिरोजी इंदुलकर सन्मान पुरस्कार ), शिवचरित्रांची शेकडो पुस्तके आणि दुर्मिळ नाणी आणि वस्तूंचे संग्राहक श्री. राजा जाधव (सर रामकृष्ण भांडारकर सन्मान पुरस्कार), हुतात्मा स्मारक समिती प्रमुख, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक श्री. भाऊ सावंत (रामचंद्रपंत अमात्य सन्मान पुरस्कार), शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती दुर्गराज रायगड समितीचे जनसंपर्क प्रमुख श्री. रंजन गावडे (सुभेदार तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार), मराठाकालीन शस्त्रांचे कलात्मक प्रतिकृती निर्माते रुद्र आर्टचे श्री. सत्यजित वैद्य (वीर बाजीप्रभू देशपांडे सन्मान पुरस्कार) यांना यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

# टोयोटाने सादर केली नवी इनोव्हा क्रिस्टा

- प्रीमियम स्टायलिंग आणि नवे डिझाइन एलिमेंट्ससह

**बेंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी नवी इनोव्हा क्रिस्टा लॉन्च करण्याची घोषणा केली. नव्या बोल्ड डिझाइन एलिमेंट्स आणि अतिरिक्त सोयीसुविधांसह ही गाडी ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. टोयोटाची “एव्हर बेटर कार्स” फिलॉसफी आणि मजबूत कस्टमर-फर्स्ट अप्रोच यानुसार, हे नवीन अपग्रेड बदलत्या ग्राहक गरजा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. त्यामुळे लाखो भारतीय कुटुंबांसाठी विश्वासार्ह मोबिलिटी पार्टनर म्हणून इनोव्हा क्रिस्टाचा वारसा अधिक मजबूत होणार आहे.



दोन दशकांहून अधिक काळाच्या अपराजित आणि अद्वितीय प्रवासातून घडलेली इनोव्हा क्रिस्टा आजही भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी म्हणून ओळखली जाते. विश्वासार्हता, आराम, सुरक्षितता, लक्झरी आणि पॉवर यामुळे ती ग्राहकांची पहिली पसंती ठरली आहे. या मजबूत पायावर आधारित, नवी इनोव्हा क्रिस्टा टोयोटाच्या सतत सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. निवडक ग्रेड्समध्ये उपलब्ध अतिरिक्त फीचर्ससह, कार्यक्षमतेचे आणि सौंदर्याचे विचारपूर्वक केलेले संयोजन ग्राहकांना अधिक उंचावलेला ड्रायव्हिंग अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

आपल्या बोल्ड आणि कॉन्फिडंट स्टान्सला अधिक बळकट करण्यासाठी, नव्या इनोव्हा क्रिस्टामध्ये नव्याने डिझाइन केलेले बोल्ड पण सुसंस्कृत रेडिएटर ग्रिल दिले आहे, ज्यासोबत अपडेटेड फ्रंट बंपर गार्निश जोडलेले आहे. यामुळे फ्रंट प्रोफाइल अधिक एलिगंट आणि अॅसर्टिव्ह दिसते. रिअरमध्ये, रिफ्रेश्ड बंपर गार्निश एलिमेंट्स गाडीला अधिक व्हिज्युअल सॉलिडिटी देतात आणि तिच्या मस्क्युलर अपीलला बळकटी देतात, तर एमपीवीचा परिचित आणि विश्वासार्ह सिल्हूट कायम ठेवतात. नव्या बदलांमुळे लुकमध्ये ताजेपणा आला असला तरी, इनोव्हा क्रिस्टा रोजच्या ड्रायव्हिंग कंडीशन्समध्ये आपली उपयुक्तता आणि विश्वासार्ह परफॉर्मन्स कायम ठेवते.

नव्या इनोव्हा क्रिस्टामध्ये परिष्कृत प्रीमियम कॅबिन आहे, जे एलिगंट पण टफ कॅरेक्टर दर्शवते. नव्या ड्युअल-टोन लेदर सीट अपहोल्स्ट्रीसह, इन्स्ट्रूमेंट पॅनल, डोअर ट्रिम्स आणि बेझल्समध्ये ग्रेस कॉपर व वुड-पॅटर्न हायलाइट्स दिले आहेत, ज्यामुळे इंटिरियरला एकसंध आणि आधुनिक थीम मिळते. कॅबिनमध्ये एसी कंट्रोल्स, स्विचेस आणि रिअर सीट बॅक टेबलमध्ये सुधारित डिटेलिंग दिले आहे, ज्यामुळे व्हिज्युअल डेप्थ आणि क्वालिटीची अनुभूती अधिक चांगली होते.

सोयीसुविधा आणि रोजच्या वापरातील उपयुक्तता वाढवण्यासाठी वायरलेस चार्जर आणि टायर प्रेशर मॉनिटरिंग सिस्टम (TPMS) सारखी फीचर्स दिली आहेत, ज्यामुळे फंक्शनॅलिटी आणि सुरक्षितता अधिक मजबूत होते. लॉन्चबद्दल प्रतिक्रिया देताना, श्री. सबरी मनोहर, एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट – सेल्स, सर्व्हिस आणि यूज्ड कार बिझनेस, टोयोटा किर्लोस्कर मोटर म्हणाले: “1.3 मिलियनहून अधिक इनोव्हा युनिट्सची विक्री करून, इनोव्हा क्रिस्टा ने एमपीवी सेगमेंटमध्ये अपराजित बेंचमार्क्स निर्माण केले आहेत. दोन दशकांच्या वारशातून मिळालेली विश्वासार्हता, आराम आणि मूल्य यामुळे ती ग्राहकांची पहिली पसंती ठरली आहे.

नव्या इनोव्हा क्रिस्टा मध्ये सूक्ष्म पण महत्त्वपूर्ण अपडेट्स दिले आहेत, ज्यामुळे ताजेपणा आला आहे, आणि ग्राहकांना सर्वाधिक महत्त्वाचे वाटणारे गुणधर्म कायम ठेवले आहेत. सतत सुधारणा आणि ग्राहक-केंद्रित इनोव्हेशनच्या मार्गदर्शनाखाली, आम्ही जीवनाच्या प्रत्येक टप्प्यासाठी विश्वासार्ह मोबिलिटी देण्यास कटिबद्ध आहोत.”

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.